दाखल तारीख : ०१.०१.२०१४
नोंदविले तारीख : ०१.०१.२०१४
निकाल तारीख : १७.०१.२०१५
कालावधी : व म दि.
०१ ०० १६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, ठाणे यांचे न्यायालयात, ठाणे येथे
( श्री. आर.एस.कानडे यांचे समोर )

नियमित फौजदारी खटला क. ०१/२०१४ निशाणी क.१७

सरकार ... अभियोग पक्ष
( पोलीस स्टेशन मुंब्रा )

वि.

१) युवराज रामचंद्र बुगडे.
वय : २६ वर्षे,
२) सौ.तानिया युवराज बुगडे. ... आरोपी
वय : २६ वर्षे,
दोघे राहणार-राहुल भवन,
रूम न.२०४, साबे रोड,
दिवा-पश्चिम, जिल्हा ठाणे.

गुन्हा :- भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४
आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये

सहाय्यक सरकारी अभियोक्ता : सौ.शिंदे
आरोपीतर्फे विधिज्ञ : सौ.रूपाली म्हात्रे.

: <u>न्यायनिर्णय</u> :
( दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी घोषित केला. )

आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३२३, ३२४ आणि ५०४ सह कलम ३४ या गुन्हयासाठी दोषारोपपत्र दाखल आहे.

२. अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

फिर्यादी मुकेश कुमार हेमला महतो व आरोपी हे साबे रोड, दिवा येथील रहिवासी आहेत. दि.०४.१०.२०१२ रोजी दुपारी ०२.०० वाजता फिर्यादी हा आरोपी क.१ चे घरी उसने दिलेले पैसे मागण्यासाठी गेला असता त्याने 'आता माझेकडे पैसे नाहीत नंतर देतो' असे सांगितले. फिर्यादीने आरोपी क.१ यास 'मला आत्ताच पैसे दे मला फार गरज आहे' असे म्हणताच आरोपी क.१ ला त्या गोष्टीचा राग आला. त्याने फिर्यादीला पकडुन धरले व आरोपी क.२ ने फिर्यादीचे डोक्यात बाटली मारली. त्यामुळे फिर्यादी जखमी झाला. त्यावेळी इतर दोन लोक तेथे आले व त्यांनीही फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली. म्हणून वर नमुद आशयाची फिर्याद फिर्यादीने मुंब्रा पोलीस ठाण्यात दाखल केली. त्यानुसार गु.र.नं.I ५८२/२०१२ हा नोंद करण्यात आला. पोलीस हवालदार डी.एस.तांबे यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. फिर्यादीला वैदयकीय उपचाराकरीता छत्रपती शिवाजी रूग्णालय, कळवा येथे पाठवले व त्याच्या जखमांबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त केले. साक्षीदारांची टिपणे नोंदविली, फिर्यादीचे पुरवणी टिपण नोंदवले व तपासाअंती आरोपींविरूध्द या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. मी आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान कलम ३२३, ३२४ आणि ५०४ या गुन्हयांसाठी नि.क.८ ला दोषारोप निश्चित केला व आरोपींना समजावुन सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करून खटला चालविण्याची मागणी केली.

४.		आरोपींविरूध्द कोणताही पुरावा आला नसल्याने त्यांची फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी नोंदविण्यात आली नाही. अभियोग पक्षातर्फे सौ.शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे सौ. रूपाली म्हात्रे, विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

५.		विचाराधीन आलेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष आणि कारणामिमांसा खालीलप्रमाणे :-

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. दि.०४.१०.२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता राहुल भवन, रूम नं.२०४, २रा मजला, साबे रोड, दिवा येथे आरोपींनी त्यांच्या समान उददेशाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादी मुकेशकुमार महतो याला मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोचवली असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| २. वर नमुद तारीख, ठिकाणी व वेळी आरोपींनी त्यांच्या समान उददेशाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादीला ज्यामुळे मारहाण केल्यास मृत्यु होण्याचा संभव आहे अशा काचेच्या बाटलीने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोचवली असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय | नाही. |
| ३. वर नमुद तारीख, ठिकाणी व वेळी आरोपींनी त्यांच्या समान उददेशाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादीला त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल अशा उद्देशाने शिवीगाळ करून प्रक्षोभित केले असे अभियोग पक्षाने शाबित केले आहे काय ? | नाही. |
| ४. आदेश ? | . अंतिम आदेशाप्रमाणे. |

: कारणमिमांसा :

मुद्दा क.१ ते ३ करीता :-

६.		मुददा क. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची

कारणमिमांसा मी एकत्र केली आहे.

सर्वात प्रथम नमुद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी आणि आरोपी यांनी तडजोड झाल्याचे कथन करून तडजोड करण्यास परवानगी मागण्याचा अर्ज नि.१२ ला दिलेला आहे आणि तडजोडनामा नि.१३ ला दाखल केला आहे. परंतु, भारतीय दंड विधान कलम ३२४ हा तडजोडपात्र गुन्हा नसल्याने तडजोड करण्याची परवानगी देण्यात आली नाही.

७. आरोपींविरूध्द गुन्हा शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने मुकेशकुमार महतो-सा.क.१ याची साक्ष नि. १४ ला नोंदवली आहे.

वरील पुराव्या व्यतिरिक्त आरोपींनी या प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा मान्य केला असल्याने त्याला निशाणी कमांक १५ देण्यात आला.

८. मुकेशकुमार-सा.क.१ हा या प्रकरणातील फिर्यादी आहे. त्याने त्याच्या साक्षीत नमूद केले आहे की, दि.०४.१०.२०१२ रोजी कुठली घटना घडली हे त्याला आठवत नाही. त्यादिवशी दुपारी १.३० वाजता तो आरोपींच्या घरी पैसे मागण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्यांच्यात बाचाबाची झाली. कोणीतरी त्याच्या डोक्यावर तुटलेली काच मारली. त्यामुळे तो जखमी झाला. फिर्यादवरील त्याची सही जरी त्याने मान्य केली असली त्यातील मजकूर त्याला माहित नाही. त्यामुळे फिर्याद सिध्द झालेली नाही. अशा परिस्थितीत आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द करणेकामी फिर्यादीच्या साक्षीवर विसंबुन राहणे ऊचित होणार नाही.

९. फिर्यादीने साक्षीमध्ये त्याची आरोपींबरोबर तडजोड झाली आहे असे नमूद केले आहे. त्यामुळे ऊर्वरीत साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली नाही. आरोपीने फिर्यादीला मारहाण केली हे दर्शणिारा कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही.

१०. प्रस्तुतच्या प्रकरणात घटनेच्या वेळी आरोपींनी त्यांच्या समान

उदद्‌शाच्या पुरस्सरणार्थ फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी व डोक्यात काचेची बाटली मारून स्वेच्छापूर्वक दुखापत पोचवली व शिवीगाळ करून प्रक्षोभित केले असे अभियोग पक्षाने सिध्द करणे अभिप्रेत होते. परंतु, अभियोग पक्षाने सदरच्या बाबी सिध्द केलेल्या नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

<u>मुद्दा क. ४ करीता</u> :-

११. मी यापुर्वीच मुद्दा क.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवला आहे. अभियोग पक्षाने आरोपींविरूध्दचा गुन्हा सर्व शंकांपलिकडे सिध्द न केल्यामुळे आरोपी क.१ व २ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मुद्दा क.४ च्या निष्कर्षादाखल मी खालील आदेश पारीत करत आहे.

: <u>आदेश</u> :

१. आरोपी क.१) युवराज रामचंद्र बुगडे व २) सौ.तानिया युवराज बुगड यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४ व ५०४ या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे .

२. आरोपींचा जामीन कदबा व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ अन्वये पूढील सहा महिन्यांकरीता प्रत्येकी रू.७,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र सादर करावे.

ठाणे.
दि. १७.०१.२०१५.

( आर.एस.कानडे )
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
१ले न्यायालय, ठाणे.